# 'बिट्स पिलानी'च्या रसायनशास्त्र विभागातर्फे विभाग दिन

प्रतिनिधी
वास्को

सांकवाळ येथील बिट्स पिलानी के के बिर्ला गोवा कॅम्पसच्या रसायनशास्त्र विभागातर्फे विभागदिन साजरा करण्यात आला. यानिमित्त 'रसायनशास्त्रातील अलिकडील बदल' या विषयावर विद्यार्थी मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात शिक्षक, गोवा विद्यापीठाच्या एमएससी विद्यार्थी, विद्यालयाचे विद्यार्थी मिळून साठजण सहभागी झाले होते.

उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून गोवा विद्यापीठाच्या नॅचरल सायन्सचे डीन प्रा. जी. एम. नाईक तर सन्माननीय अतिथी म्हणून डेक्कन फाईन केमिकल्सच्या टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड



सांकवाळ : बिट्स पिलानी गोवा कॅम्पसच्या रसायनशास्त्र विभागाच्या विद्यार्थी मेळाव्यात प्रा. जी. एम. नाईक, डॉ. कमलेश पै फोंडेकर, प्रा. जी. रघुरामा, सुनील भंद, अंजन चट्टोपाध्याय, विद्यार्थी व इतर मान्यवर.

इंजिनिअरिंग प्रमुख डॉ. कमलेश पै फोंडेकर उपस्थित होते. याप्रसंगी बिट्स पिलानी गोवा कॅम्पसचे संचालक प्रा. जी. रघुरामा, प्रा. सुनील भंद उपस्थित होते.

रसायनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. अंजन चट्टोपाध्याय यांनी रसायशनशास्त्र विभागाच्या उपक्रमांविषयी माहिती दिली. या कार्यक्रमांतर्गत निमंत्रितांची भाषणे, तोंडी व पोस्टर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक प्रदान करण्यात आले.